स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय
महाराष्ट्र राज्य
सहावा मजला, कोकण भवन
नवी मुंबई ४००६१४

स्थायी आदेश क्रमांक ९५ /२०१७, दिनांक 14 SEP 2017

विषय: महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे लेखापरीक्षणाचेबाबत मार्गदर्शक सुचना.

प्रस्तावना:- कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक मपवि १००४/प्र.क्र. ७९/पदुम १, दिनांक ३/६/२००५ अन्वये महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर अंतर्गत असलेली महाविद्यालये, प्रक्षेत्रे व उदगीर उप केंद्राचे लेखापरीक्षण करण्यासाठी मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० च्या कलम ४ नुसार मुख्य लेखा परीक्षक यांची लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठांतर्गत वर्ग झालेल्या संस्था ज्या उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) (सद्य पदनाम सह संचालक) यांच्या कार्यकक्षेत येतात त्यांनी संबंधित संस्थांचे लेखापरीक्षण करावयाचे आहे. तथापी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर तेथे असल्याने संपूर्ण विद्यापीठाचे लेखापरीक्षण उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), नागपूर यांच्या नियंत्रणाखाली असून त्यांनी लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण करावयाचे आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे अधिनस्त महाविद्यालये, प्रक्षेत्रे व उपकेंद्रे यांचे लेखापरीक्षणाबाबत लेखापरीक्षण पथकांचे गठन व कार्यपद्धती याबाबत एकवाक्यता नाही. यास्तव महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ मुख्यालय नागपूर अंतर्गत असलेली महाविद्यालये, प्रक्षेत्रे व उप केंद्राचे लेखापरीक्षणासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

आदेश:

अ) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर चे अधिनस्त महाविद्यालये, प्रक्षेत्रे व उपकेंद्रे यांचे लेखापरीक्षणाबाबत लेखापरीक्षा पथक गठीत करण्याचे अधिकार ज्या विभागीय सह संचालकांच्या कार्यक्षेत्रात सदर महाविद्यालये, प्रक्षेत्रे व उपकेंद्रे आहेत त्या विभागाचे विभागीय सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे राहतील. ते त्यांचे कार्यालय अथवा अधिनस्त जिल्हा कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची प्रस्तूत लेखापरीक्षणाकरीता नियुक्ती करू शकतील.

आ) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे अधिनस्त महाविद्यालये, प्रक्षेत्रे व उपकेंद्रे यांचे लेखापरीक्षण कामकाजाबाबत प्राधिकृत अधिकारी पुढीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | लेखापरीक्षण कामकाजाचा प्रकार | प्राधिकृत अधिकारी |
|---|---|---|
| १ | पथक प्रमुख | सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी |
| २ | पुनर्विलोकन | लेखापरीक्षा अधिकारी |
| ३ | अहवाल वाचन | सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी |
| ४ | अहवालाचे अंतिमीकरण | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा नागपूर |
| ५ | अहवाल निर्गमन | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर |